

# यशोदा टेक्निकल कॅम्पसमध्ये सायबर सुरक्षा जागरूकता विषयक सेमिनार

**सातारा/प्रतिनिधी:**

यशोदा टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ फार्मसीमध्ये विद्यार्थ्यांसाठी नुकताच सायबर सुरक्षा जागरूकता विषयक सेमिनार आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी किक हील असोसिएशनच्या कु.सोनाली कंठे आणि कु.ज्योती राठोड प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. सध्या सायबर गुन्ह्यांमध्ये संगणक आणि डिजिटल नेटवर्क वापरून बेकायदेशीर क्रियाकलापांचा समावेश होतो जसे की हॅकिंग, आयडेंटिटी थेफ्ट आणि ऑनलाइन फसवणूक या विषयी नवीन पिढीमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हा सेमिनार आयोजित केला गेला.

प्रमुख पाहुण्यांनी त्यांच्या संभाषणात सायबर गुन्ह्यांविषयी अनेक महत्वाच्या गोष्टी सांगितल्या. सायबर क्राईम म्हणजे काय हे त्यांनी थोडक्यात सांगितले. विविध ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर सायबर गुन्हे कसे घडतात हेही त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थांनी सायबर गुन्ह्यांचा सामना कसा करायचा तसेच सायबर गुन्ह्यांपासून बचाव कसा करता येईल याविषयी मार्गदर्शन केले.

संस्थापक अध्यक्ष प्रा. दशरथ सगरे, उपाध्यक्ष अजिंक्य सगरे,प्राचार्य डॉ. व्ही.के.रेदासानी यांचे या कार्यक्रमासाठी प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सचिन एच. रोहणे, प्रा स्नेहा पाटील प्रा. अनेरी व्ही.अडसूळ, प्रा प्रिया शिंदे यांनी केले.